*नैक (NAAC) द्वारा "A" ग्रेड प्राप्त*

**महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा**

**Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwavidyalaya, Wardha**

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

*(A Central University established by Parliament by Act No. 3 of 1997)*

जनसंपर्क विभाग- Ph./Fax: 07152-252651 मो.9960562305 इ-मेल: mgahvpro@gmail.com

वेबसाइट : www.hindivishwa.org

---

### हिंदी विश्वविद्यालय में मराठी भाषा गौरव दिवस समारोह

## कुसुमाग्रज के साहित्य ने मनुष्य को केंद्र में रखा –डॉ. गंगाधर पानतावणे

### सांस्कृतिक कार्यक्रम में लावणी, पोवाडा, अभंग, भजनों की प्रस्तुतियां

### सूर्यकांत भगत लिखित 'कबीर वाणी' पुस्तक का लोकार्पण

वर्धा, 08 मार्च, 2017 : मराठी भाषा गौरव दिवस के उपलयक्ष्य में मंगलवार 6 मार्च को महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय में आयोजित कार्यक्रम में अस्तिमादर्शकार, सुप्रसिद्ध साहित्यकार डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद ने कहा कि ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवि कुसुमाग्रजने अपने साहित्य के केंद्र में मनुष्य को रखकर मराठी के साथ भारतीय साहित्य पर गहरा प्रभाव ड़ाला है। वे अग्निरेखा से कविता रचनेवाले तपस्वी कवि थे। उनका साहित्य सामाजिक न्याय के प्रति सचेत है।

विश्वविद्यालय के हबीब तनवीर सभागार में कुलपति प्रो. गिरीश्वर मिश्र की अध्यक्षता में आयोजित समारोह में प्रतिकुलपति प्रो. आनंद वर्धन शर्मा, साहित्य विद्यापीठ के अधिष्ठाता प्रो. के. के. सिंह, मराठी विभाग के प्रभारी अध्यक्ष डॉ. शैलेश मरजी कदम




उपस्थित थे। कार्यक्रम में मराठी और हिंदी भाषी विद्यार्थियों ने लावणी, पोवाडा, अभंग एवं नृत्य प्रस्तुत कर श्रोताओं को मुग्ध कर दिया। विदति हो कि मराठी भाषा गौरव दिवस हर वर्ष पिछले पांच सालों से विश्वविद्यालय में मनाया जाता है। विवि में मराठी विभाग शुरू होने से इस वर्ष का आयोजन मराठी विभाग की ओर से किया गया। कार्यक्रम में सेवाग्राम के सुविख्यात कवि एवं गायक सूर्यकांत भगत लिखित कबीर वाणी पुस्तक का लोकार्पण मंचस्थ अतिथियों द्वारा किया गया। संत कबीर के हिंदी दोहे उन्होंने मराठी में अनूदित किये हैं जिसमें से कुछ दोहों का पाठ किया।

डॉ. पानतावणे ने कुसुमाग्रज के समस्त साहित्य पर प्रकाश ड़ालते हुए कहा कि कुसुमाग्रज ने 1933 में जीवन लहरी तथा 1942 में विशाखा कविता संग्रह में सामाजिक एवं सांस्कृतिक कुरितियों पर प्रहार किया। स्वतंत्रता प्राप्ति के आंदोलनों का उनके



साहित्य पर प्रभाव था। उन्होंने वैष्णवी उपन्यास और नटसम्राट नाटक के माध्यम से मराठी साहित्य में अपना महत्वपूर्ण योगदान दिया है। मराठी के विस्तार को लेकर उन्होंने कहा कि इंग्लैंड और अमेरिका जैसे देशों में मराठी भाषी लोगों की उल्लेखनीय संख्या है।



उन्होंने माना कि प्रमाण भाषा को बल प्रदान करने के लिए बोली भाषा जिवंत रहनी चाहिए।

अध्यक्षीय उदबोधन में कुलपति प्रो. गिरीश्वर मिश्र ने कहा कि विजय तेंदुलकर, माधवराव सप्रे, भारतेंदु हरिश्चंद्र एवं विष्णू बाबूराव पराडकर जैसे साहित्यकारों ने मराठी के साथ-साथ हिंदी भाषा को एक नई उंचाई प्रदान की है। हिंदी के विकास में मराठी भाषा




का महत्वपूर्ण योगदान है। दोनों भाषाओं में पारस्परिक संबंध दृढ होने से दोनों और समृद्ध हो सकती हैं। प्रतिकुलपति प्रो. आनंद वर्धन शर्मा ने कहा कि नागपुर में प्रथम विश्व हिंदी संमेलन का आयोजन एवं राष्ट्रभाषा प्रचार समिति का मुख्यालय वर्धा में होने से यह




प्रतीत होता है कि महाराष्ट्र एवं वर्धा का हिंदी से गहरा नाता है। अधिकतर हिंदी फिल्में महाराष्ट्र में ही बनती है और पूरे विश्व में प्रदर्शित होती हैं, यह भी हिंदी की सेवा में उल्लेखनीय है।

साहत्यि विद्यापीठ के अधिष्ठाता प्रो. के. के. सिंह ने कहा कि भक्ति आंदोलन का प्रारंभ महाराष्ट्र में हुआ है। इस भूमि के संतों ने जितनी मराठी की सेवा की है उतनी ही हिंदी की भी की है। कार्यक्रम में डॉ. मधुकर कासारे, प्रा. राजेंद्र मुंढे, प्रा. प्रमोद नारायणे,



डॉ. रवींद्र बोरकर, विनोद वैद्य, संदीप सपकाळे, डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, डॉ. अनिल कुमार दुबे, बी. एस. मिरगे, डॉ. लेखराम




दन्नाना, अनिर्बाण घोष, डॉ. सुरजीत कुमार सिंह, डॉ. हिमांशु शेखर, डॉ. अमित राय, डॉ. अमरेंद्र कुमार शर्मा सहित वर्धा के गणमान्य नागरिक एवं विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे।

स्वागत गीत मेघा देशमुख ने प्रस्तुत किया। कार्यक्रम का प्रास्ताविक सहायक प्रोफेसर शैलेश मरजी कदम ने किया संचालन सहायक प्रोफेसर सुषमा लोखंडे ने किया तथा आभार प्रदर्शनकारी कला विभाग के प्रभारी अध्यक्ष डॉ. सतीश पावड़े ने माना। इस






महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा
मराठी विभाग, साहित्य विद्यापीठ
'मराठी भाषा गौरव दिवस' कार्यक्रम में
हार्दिक


महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी
मराठी विभाग, साहित्य
'मराठी भाषा गौरव
आपका हार्दिक




महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा
मराठी विभाग, साहित्य विद्यापीठ
'मराठी भाषा गौरव दिवस' कार्यक्रम में
आपका हार्दिक स्वागत।


महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा
मराठी विभाग, साहित्य विद्यापीठ
'मराठी भाषा गौरव दिवस' कार्यक्रम में
आपका









अवसर पर विभिन्न विभागों के विद्यार्थियों ने महाराष्ट्र की लावणी, अभंग, भजन, पोवाड़ा, गीत एवं नृत्य के माध्यम से सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत किये।

### हिंदी विश्वविद्यालयात मराठी भाषा गौरव दिवस समारोह

## कुसुमाग्रजांनी मनुष्यत्वाच्या अहंगंडाला सुरूंग लावणारे साहित्य लिहिले–डॉ. गंगाधर पानतावणे

### मराठमोठया लावणी, पोवाडा, अभंग, भजनांनी दुमदुमला परिसर

वर्धा, 08 मार्च, 2017 : मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मंगळवारी (6 मार्च) महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अस्तिमादर्शकार, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद यांनी कुसुमाग्रजांच्या समग्र साहित्यावर भाष्य करतांना सांगितले की कुसुमाग्रजांनी मनुष्यत्वाच्या अहंगंडाला सुरूंग लावून मराठी साहित्यात मानाचा ठसा उमटविला. ते अग्निरेषेने काव्य लिहिणारेत तपस्वी कवि होते. नैतिक जाणीवेचे अनुबंध प्रकट करून त्यांनी लिहिलेले साहित्य सामाजिक न्यायाची साक्ष देतात. कुसुमाग्रजांनी आपल्या साहित्यातून बंधमुक्त माणूस केंद्रस्थानी मानून नवी प्रतीकं आणि मिथकं मांडून सामाजिक व सांस्कृतिक आशयाचे लिखान केले.

विश्वविद्यालयातील हबीब तनवीर सभागृहात कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा गौरव दिन मोठया दिमाखात संपन्न झाला. यावेळी मंचावर प्रकुलगुरु प्रो. आनंद वर्धन शर्मा, साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. के. के. सिंह, मराठी विभागाचे प्रभारी अध्यक्ष शैलेश मरजी कदम उपस्थित होते. यावेळी मराठी आणि हिंदी भाषक विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लावणी, पोवाडा, अभंग आणि मराठी भजनांनी परिसर दुमदुमला होता. मराठी भाषा गौरव दिवस दरवर्षी गेल्या पाच वर्षांपासून उत्साहाने साजरा करण्यात येतो. कार्यक्रमात सूर्यकांत भगत यांच्या कबीर वाणी या हिंदीतील मराठी दोहयांच्या पुस्तकाचे लोकार्पण करण्यात आले. भगत यांनी निवडक दोहे हिंदी व मराठीतून सादर केले.

डॉ. पानतावणे यांनी कुसुमाग्रजांच्या समग्र साहित्याचा आढावा घेत आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून मराठी भाषेचा उमग, तिचे भारतीय साहित्यातील स्थान आणि सद्यस्थिती यावर सांगोपांग भाष्य केले. ते म्हणाले की 1933 मध्ये जीवन लहरी, 1942 मध्ये विशाखा या काव्यसंग्रहातून कुसुमाग्रजांनी सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातल्या दोषांवर प्रहार केले. त्यांच्या साहित्यावर त्याकाळच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय आंदोलनाचा परिणाम प्रदर्शित होतो. त्यांच्या प्रेम कवितांनाही सामाजिक व सांस्कृतिक आशय आहे. याचाच प्रत्यय त्यांच्या वैष्णवी या पहिल्या कादंबरीतून आणि नटसम्राट या अजरामर नाटकातून येतो.

मराठीच्या विस्ताराचा उल्लेख करून डॉ. पानतावणे म्हणाले की आता मराठी भाषा सातासमुद्रापल्याड गेली आहे. इंग्लंड आणि अमेरिकेसारख्या देशांमध्ये मराठी भाषकांचा मोठा वर्ग आहे. असे असतांना मराठीला अजूनही अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला नाही याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली. संघर्षाशिवाय तसे होणे नाही असेही ते म्हणाले. प्रमाण भाषा आणि बोली भाषा याविषयी त्यांनी सांगितले की प्रमाण भाषेला सबळ करण्याचे काम बोली भाषाच करतात म्हणून बोली टिकल्या पाहिजेत. कुसुमाग्रजांसारखा महान लेखक मराठी मुलुखात जन्माला येणे ही महान घटना होय असे सांगतांना ते म्हणाले की त्यांच्या रूपाने मराठीच्या ध्वजाकडे पाहून अनेक महान लेखक सलाम करतात.

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र म्हणाले की विजय तेंडुलकर, माधवराव सप्रे, भारतेंदु हरिश्चंद्र आणि विष्णू बाबूराव पराडकर यांच्यासारख्या साहित्यिकांनी मराठीबरोबच हिंदी भाषेचा गौरव वाढविला. हिंदीच्या विकासात मराठीचे मोलाचे योगदान आहे असे सांगून ते म्हणाले की उभय भाषांमध्ये पारस्पारिक संबंध विकसित झाले तर त्या आणखी समृद्ध होतील. यावेळी प्रकुलगुरु प्रो. आनंद वर्धन शर्मा यांनीही विचार मांडले. नागपुरात प्रथम विश्व हिंदी संमेलनाचे आयोजन आणि वर्धेत राष्ट्रभाषा प्रचार समितिचे मुख्यालय असणे यातून महाराष्ट्राचा हिंदीशी निकटचा संबंध आहे हे उघड होते. हिंदी चित्रपट हे मुख्यत्वे महाराष्ट्रात म्हणजे मायानगरी मुंबईत तयार होतात आणि संपूर्ण जगात प्रदर्शित होतात, यातून महाराष्ट्राचे हिंदीसाठीचे योगदान अधोरेखित होते असेही त्यांनी नमूद केले.

प्रो. के. के. सिंह यांनी महाराष्ट्रातील संतांची परंपरा आणि साहित्य यावर विचार व्यक्त केले. भक्ति आंदोलनाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवल्या गेली असे सांगून त्यांनी मराठी साहित्यातील संत आणि नामवंत साहित्यिकांचा उल्लेख केला.

कार्यक्रमाला डॉ. मधुकर कासारे, प्रा. राजेंद्र मुंढे, प्रा. प्रमोद नारायणे, डॉ. रवींद्र बोरकर, विनोद वैद्य, संदीप सपकाळे, डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, डॉ. अनिल कुमार दुबे, डॉ. दन्नाना, अनिर्बाण घोष, डॉ. सुरजीत कुमार सिंह, डॉ. हिमांशु शेखर, डॉ. अमित राय, डॉ. अमरेंद्र कुमार शर्मा यांच्यासह वर्धेतील गणमान्य नागरिक आणि विद्यार्थी मोठया संख्येने हजर होते.

स्वागत गीत मेघा देशमुख यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक प्रोफेसर शैलेश मरजी कदम यांनी केले. संचालन मराठी विभागातील सहायक प्रोफेसर सुषमा लोखंडे यांनी केले तर आभार प्रदर्शनकारी कला विभागाचे प्रभारी अध्यक्ष डॉ. सतीश पावडे यांनी मानले.

यावेळी मराठी आणि हिंदी भाषक विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धतेचा परिचय आपल्या सादरीकरणातून करवून दिला.